## उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सामान्य यांजकडून

जिल्हा धुळे

क्रमांक भूसंपादन/सामान्य/कावि-२१९/एसआर-०३/२०१६.—ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सामान्य, धुळे यांना असे वाटते की, सोबतच्या अनुसूचीमध्ये ज्यांचा तपशील नमूद करण्यात आला आहे अशा जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे ;

त्याअर्थी, आता, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे ज्याचा निर्देश "संपादन अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम ११ *(१)* च्या उपबंधान्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनी उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहेत किंवा आवश्यक असण्याचा संभव आहे ;

उक्त जमिनींमध्ये हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे अशी ताकीद देण्यात येते की, उक्त संपादनाच्या प्रयोजनासाठी उक्त जमिनींवर नेमण्यात आलेल्या कोणत्याही भूमापकांच्या किंवा अन्य व्यक्तींच्या कामात त्यांनी अडथळा किंवा व्यत्यय आणू नये. ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर जिल्हाधिकारी यांची मंजुरी न मिळवता विक्री, भाडेपट्टा, गहाण, अभिहस्तांतरण, देवाण-घेवाण याद्वारे किंवा अन्य प्रकारे उक्त जमिनींची विल्हेवाट लावण्यासंबंधात करण्यात आलेले कोणतेही करार किंवा त्यासंबंधात करण्यात आलेला कोणताही खर्च किंवा सुधारणा संपादन जमिनींच्या अंतिमरित्या संपादन करण्यात येईल अशा भागासाठी भरपाई निश्चित करणारा अधिकारी संपादन अधिनियमाच्या कलम ११ *(४)* अन्वये दुर्लक्ष करील.

उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी आवश्यक आहेत याबद्दल नाशिक विभागाच्या आयुक्तांची खात्री होईल तर संपादन अधिनियमाच्या कलम २१ *(१)* अन्वये तशा अर्थाची एक अंतिम अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल. संपादनाचे काम जर अंशतः किंवा संपूर्णतः सोडून देण्यात येईल, तर ती वस्तुस्थिती महाराष्ट्र शासन राजपत्रात रीतसर अधिसूचित करण्यात येईल.

उक्त जमिनींचे नकाशे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सामान्य, धुळे यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरिता उपलब्ध आहेत.

कार्यकारी अभियंता, मध्यम पाटबंधारे प्रकल्प, क्रमांक १, धुळे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक धुमप्रवि-धुळे/भूसं-२०७६/सन २०१७, दिनांक ६ जून २०१७ अन्वये संपादन अधिनियमाच्या कलम ४० प्रमाणे उक्त जमिनींचे शीघ्र संपादन करण्याची विनंती केली आहे. असे शीघ्र संपादन करणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे. सबब, संपादन अधिनियमाच्या कलम ९ प्रमाणे सदर प्रकरणी सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करण्यात आलेला आहे.

सदर अधिसूचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत, त्या अधिसूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सामान्य, धुळे यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

ज्यासाठी जमिनी संपादन करावयाच्या आहेत ते प्रयोजन.— वाडी-शेवाडी मध्यम प्रकल्प, उजवा कालवा-वितरिका करणेकामी जमीन भूसंपादन, मौजे बोरीस, तालुका धुळे.

**टीप**.— सदर प्रकरणात संयुक्त मोजणी बाकी असल्याने संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झाल्यावर संपादित क्षेत्रात कमी-जास्त बदल होऊ शकतो.

### अनुसूची

### परिशिष्ट - १

**भूसंपादन प्रस्ताव क्रमांक भूसं/एसआर-३/२०१६**

**जमिनींचा तपशील**

**जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे बोरीस**

| गट नंबर | | संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| २०२-क | .. | ० ०६ |
| ३४६/१ | .. | ० २० |
| | एकूण .. | ० २६ |

### परिशिष्ट - २

**सार्वजनिक प्रयोजनाबाबत तपशील**

**प्रकल्पाचे नाव.**— वाडी-शेवाडी मध्यम प्रकल्प

**प्रकल्पाचे प्रयोजन.**— वाडी-शेवाडी मध्यम प्रकल्प, उजवा कालवा, वितरिका करणेकामी जमीन भूसंपादन, मौजे बोरीस, तालुका धुळे.

### परिशिष्ट - ३

**विस्थापनाबाबत तपशील**

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने विस्थापनाबाबत तपशील निरंक आहे.

### परिशिष्ट - ४

**सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचे निष्कर्ष**

वाडी-शेवाडी प्रकल्पांतर्गत धुळे आणि शिंदखेडा तालुक्यातील ५ हजार ९८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याचे प्रस्तावित आहे. त्यामध्ये तालुकानिहाय अनुक्रमे ३ आणि १ गावांचा समावेश आहे. या गावांचा सिंचन क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीला मोठा फायदा होणार आहे. उपजीविकेची साधने वाढून अन्नसुरक्षेची हमी मिळणार आहे. तसेच अर्थव्यवस्था सुधारायला मोठा वाव मिळणार आहे. म्हणून सदर प्रकल्प आणि त्याअंतर्गत करावयाची कामे लवकरात लवकर हाती घेण्यात येऊन प्रकल्प पूर्ण करण्याची शिफारस पूर्ण करण्यात येत आहे.

### परिशिष्ट - ५

**प्रशासक नियुक्तीचा तपशील**

प्रस्तुत प्रकरणी एकही व्यक्ती / कुटुंब विस्थापित होत नसल्याने पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

**रवींद्र भारदे,**

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), सामान्य,

धुळे, १३ जुलै २०१७. धुळे.